# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

दि.०४/०५/२०२४

**रेल्वे कल्व्हर्ट क्र.८३ जवळ असलेल्या नाल्यामध्ये केलेला माती भराव काढून नाल्याचा मार्ग खुला करणे बाबत महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यात बैठक संपन्न**

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार पूर्व येथील रेल्वे कल्व्हर्ट क्र.८३ जवळ विरार पूर्व येथून येणाऱ्या नाल्यामध्ये मातीचा भराव करून रेल्वेद्वारे सदर नाला तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आला आहे. नाल्यामधील मातीभराव पावसाळ्यापूर्वी साफ करणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने दि.०३ मे २०२४ रोजी मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका श्री.अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका अधिकारी व रेल्वे अधिकारी यांची बैठक महानगरपालिका मुख्यालयात संपन्न झाली.

विरार पूर्व येथील रेल्वे कल्व्हर्ट क्र.८३ जवळील नाल्यातील मातीभराव न काढल्यास पावसाळ्यात अतिवृष्टी होऊन पावसाळी पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन विरार पूर्वेकडील संतनगर, सेन्ट्रल पार्क, जय श्री जगन्नाथ नगर या सखल भागात पाणी साचून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची तसेच नालासोपारा रेल्वेस्टेशन देखील पाण्याखाली येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे कल्व्हर्ट क्र.८३ जवळील नवीन रेल्वे ट्रॅकचे काम तात्काळ पूर्ण करून दि.२१ मे पर्यंत नाल्यातील मातीभराव काढून नाला खुला करणेचे निर्देश मा.आयुक्त महोदयांनी उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांना दिले. रेल्वे प्रशासनाद्वारे मनपा हद्दीतील रेल्वेलगत असलेली सर्व कल्व्हर्ट दि.२१ मे पर्यंत साफ करण्याची हमी यावेळी उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.

त्याचप्रमाणे नाल्यालगत जाणाऱ्या रेल्वेच्या विद्युत वाहक केबल्ससाठी केबल्स ब्रिज तयार करणे, तसेच आपत्कालीन स्थितीत नागरिकांना रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करणेसाठी कंट्रोल रूम स्थापन करून त्याचे संपर्क क्रमांक प्रसिद्धीस देणेच्या सूचना यावेळी मा.आयुक्त यांनी दिल्या. तसेच याअनुषंगाने रेल्वेलगतच्या सर्व कल्व्हर्ट,नाले यांची सफाईची स्थिती व त्यावरील उपाययोजना करणेच्या अनुषंगाने मंगळवार दि.०७ मे रोजी महानगरपालिका अधिकारी, अभियंता तसेच रेल्वे अधिकारी, अभियंता यांचा संयुक्त पाहणी दौरा आयोजित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

या बैठकीस मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे, उप-आयुक्त घनकचरा व्यवस्थापन श्री.नानासाहेब कामठे, उप-आयुक्त श्री.सदानंद पूरव, उप-आयुक्त दीपक झिंझाड, संबंधित सहा.आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता, आरोग्य निरीक्षक, तसेच रेल्वे विभागामार्फत श्री.ध्रुवराज सरोज (SSE P.Way BYR.WR), श्रीमती दीक्षा गोला (Asst.Manager,MRVC) व इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका